N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** नंदुरबार शहर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0931 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/11/2021 19:40 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 23/11/2021

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/11/2021

**Time From (वेळेपासून):** 12:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/11/2021 **Time (वेळ):** 19:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 024 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/11/2021 19:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा परिषद, नंदुरबार ,येथील लघु सिंचन , विभागातील कार्यालयात,नंदुरबार, 425412

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. शैलेष टिकाराम चौरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1997 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा गंगापुर,पोस्ट ठाणेपाडा,नंदुरबार,नंदुरबार तालुका,नंदुरबार,महाराष्ट्र,425412,भारत |
| 2 | स्थायी पता | रा गंगापुर,पोस्ट ठाणेपाडा,नंदुरबार,नंदुरबार तालुका,नंदुरबार,महाराष्ट्र,425412,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8380807476

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्री. गुनेष चंद्रकांत सुगंधी | | वडील का नाम : चंद्रकांत सुगंधी | 1. कनिष्ठ सहायक ,लघुसिंचन विभाग, जिल्हा परीषद नंदुरबार ,नंदुरबार, नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत-425412 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | मागणी केलेली लाचेची रक्कम आज दिनांक 23/11/2021 रोजी पंच साक्षीदारासमक्ष स्विकारताना त्यांना लोकल | 2,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,500.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी श्री शैलेश टिकाराम चौरे, वय 24 वर्षे, व्यवसाय- बांधकाम व्यवसाय, मुळ रा. गंगापुर, पोस्ट ठाणेपाडा, ता. जि. नंदुरबार. समक्ष फिर्याद लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी माझे वडील श्री टिकाराम भिला चौरे, आई मिराबाई, मोठा भाऊ विषाल असेसह राहतो. माझे वडील शेती व्यवसाय करतात. माझा मोठा भाऊ विषाल हा बांधकाम ठेकेदार असुन सन 2018 मध्ये त्यांना बांधकाम करणेबाबत शासकीय परवाना प्राप्त झाला आहे. त्याचा नोंदणीकृत परवाना क्रमांक 27BOMPC1277A1ZA असा आहे. सध्या माझा मोठा भाऊ विषाल यास जिल्हा परीशद, नंदुरबार येथील लघु सिंचन विभाग येथून सन 2018-2019 मध्ये दुधाळे येथील साठवण बंधारा नं. 1, हरीपुर येथील साठवण बंधारा न.2 व वाघाळे येथील सधानकिय पुर्नभरण बंधारा नं. 4 व नं. 1 असे लघुबंधारे बांधकामाचे काम मिळालेले होते. माझा सिव्हील डिप्लोमा झालेला असल्याने मी भाऊ विषाल यास वरील कामकाजाकरीता षासकीय ठेक्याचे बांधकाम व इतर कामात योग्य ती मदत करीत असतो त्यात सरकारी कामासंबंधी पत्रव्यवहार करणे, सरकारी अधिकारी व कर्मचारी यांना कामासंबधी भेटणे तसेच सदर कामे निविदेप्रमाणे बिल रकमा काढणे, काम पुर्ण झालेनंतर त्यांचे सुरक्षा अनामत रकमा परत घेणे, अषी कामे मी करीत असतो. त्याचे बदल्यात भाऊ विषाल मला योग्य मोबदला देतो. माझे सरकारी कार्यालयात तसेच जिल्हा परिशद लघु सिचन विभाग येथे नेहमी जाणे येणे असल्याने सर्व अधिकारी व कर्मचारी मलाच ओळखतात व माझेषी सर्व व्यवहार करीत असतात. आम्हाला वरील नमुद गावांचे मिळालेल्या कामापैकी दुधाळे, हरीपुर व वाघाळे गावाचे सन 2019 मध्ये सर्व लघु बंधारे बांधकामाचे कामे पुर्ण झाले असुन त्यांचे कामाची बिले मिळाली आहेत. परंतू सदर कामांचे बिलामधुन 10 टक्के कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम जिल्हा परीशद, लघु सिंचन विभागामार्फत सदर फाईलचे कामकाज पूर्ण झाल्यावर धनादेष स्वरुपात मिळणार आहे. त्याकरीता दिनांक 18/11/2021 रोजी मी, लघु सिंचन विभाग, नंदुरबार येथे जावून संबधीत लिपीक श्री.सुगधी यांना भेटून लघु बंधारे बांधकाम पुर्ण केलेल्या वरील तिन्ही कामांची 10 टक्के सुरक्षा अनामत रक्कम धनादेष काढणेबाबत विचारणा केली असता त्यानी मला सांगितले की, तुमच्या बिलाचे फाईलचे काम मी करून देतो असे सांगून, माझेकडून सदर काम करुन देण्याचे मोबदल्यात 2500/- रुपये लाचेची मागणी केली आहे. सदर लाचेची रक्कम दिली नाही तर माझे फाईलचे व धनादेषचे काम होणार नाही, अषी माझी खात्री झालेली आहे. तरी मला त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने तसेच त्यांचेत व माझेत कोणत्याही स्वरुपाचा अर्थिक देवाणघेवाणीचा व्यवहार नसल्याने श्री सुगधी यांचेविरुध्द तक्रार दिनाक 22/11/2021 रोजी सकाळी 11.30 वा. मी अॅन्टी करप्षन ब्युरो, नंदुरबार कार्यालय येथे दिली होती. दिनाक



Scanned with CamScanner

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner

...गले आहेत असे सांगुन आणले हेत का त्यावर तक्रारदार यांनी

13. Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): kirankumar bhimrao khedkar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
चंद्रपूर शहर पो.स्टे.

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): kirankumar bhimrao khedkar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(रा.):



Scanned with CamScanner

काही वेळानंतर मी व पंच नं. 1 श्री. वसावे हे आपण थांबल्या ठिकाणी आंबेडकर भवन समोरील रोडालगत आडोशाजवळ लावलेल्या खाजगी वाहनात आलो तेव्हा पोना/नावाडेकर यांनी माझे टी-शर्टचे आतील बनियनला लावलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यांचे ताब्यात घेतले ती वेळ 17.35 वाजेची होती.

त्यानंतर आपण पंच नं. 1 श्री. किसन वसावे यांना पंच नं.2 श्रीमती उषा साळुंके यांचेसमक्ष विचारले की, ''आपणास व तक्रारदार अषांना जिल्हा परिषद, नंदुरबार येथे श्री. सुगंधी व त्यांची वरिष्ठ निलीमा मॅडम यांची भेट घेण्यासाठी आंबेडकर भवन समोरील रोडालगत आडोशाजवळुन रवाना केल्यापासून ते परत येईपावेतो काय काय घटना घडली? असे विचारता पंच नं. 1 यांनी सांगितले की, ''मी व तक्रारदार असे जिल्हा परिषद नंदुरबार कार्यालयातील लघुसिंचन विभागात गेलो असता त्याठिकाणी पुन्हा लिपीक श्री.सुगंधी हे भेटले त्यावेळी तक्रारदार यांनी श्री.सुगंधी यांना विचारले की, सुगंधी नाना फाईल ठेवल्यात का मध्ये त्यावर लिपीक श्री.सुगंधी यांनी सांगीतले की, ठेवले आहेत असे सांगुन 'आणले हेत का' त्यावर तक्रारदार यांनी **सांगीतले की, 'किती', त्यावर** लिपीक श्री सुगंधी यांनी सांगीतले की ''घडी घडी का विचारतो तु, तुला सांगीतल्याच लक्षात नाही आल का तुझ्या'' असे सांगुन तक्रारदार यांना निलीमा मॅडमला भेटण्यासाठी पाठविले त्यावेळी निलीमा मॅडम यांनी तक्रारदारास चलो, सुबह से आया बेटा तुम व ठिक है असे सांगीतले. व त्याच्या बिलाच्या फाईलीवर सह्या करुन दिल्या. तक्रारदार याने त्या फाईली घेवुन कार्यालयातील आवक जावक बारनिशी मॅडमकडे दिल्या बाबत हकीकत सांगीतली. तसेच आपण मला विचारता मी देखील वरीलप्रमाणे मिळती-जुळती हकीगत सागितली.

त्यानंतर सदर ठिकाणी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषणाची स्क्रिप्ट तयार करणे व पंचनामा करण्यासारखी परिस्थिती नसल्याने आम्ही पुन्हा सर्वानुमते अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात परत आलो.

त्यानंतर माझेत व लिपीक श्री. सुगंधी यांचेतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण झाले असुन सदरचे व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण हे आपण, मी, पंच नं.1 श्री. वसावे व पंच नं.2 श्रीमती साळुंके यांचेसमक्ष अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात आपण सर्वानी ऐकले. पडताळणी दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषणाची स्क्रिप्ट तक्रारदार व दोन्ही पंचाच्या मदतीने पुन्हा ऐकुन त्याची स्क्रिप्ट पोना/संदिप नावाडेकर यांनी अँन्टी करप्शन कार्यालय, नंदुरबार येथे तयार केली.

सदर स्क्रिप्टवरुन लिपीक श्री. सुगंधी यांचे वरिष्ठ अधिकारी श्रीमती निलीमा मॅडम यांनी माझेकडे कोणत्याही प्रकारची लाचेची मागणी केली नसल्याचे आज पंच साक्षीदारा समोर केलेल्या पडताळणी मध्ये स्पष्ट झाले होते.

त्यानंतर आपल्या सुचनेवरुन पोना/नावाडेकर यांनी माझे, लिपीक श्री. सुगंधी व त्यांचे वरिष्ठ अधिकारी निलीमा मॅडम यांचेत ध्वनीमुद्रीत झालेले वरनमुद संभाषणाचे मेमरीकार्ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्येच ठेवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर संगणकास जोडणी करुन त्याची हॅश व्हॅल्यु काढुन, हॅश व्हॅल्यु सर्टीफिकेटची प्रिंट काढुन दोन्ही पंचानी व आपण सहया करुन ते कागदपत्रात समाविष्ट केले. मेमरीकार्ड एका लहान प्लॅस्टीकच्या कव्हरमध्ये ठेवुन ते एका खाकी पाकीटात घालुन पाकीटावर 'तक्रारदार श्री शैलेश चौरे व लिपीक श्री. गुप्तेश सुगंधी व श्रीमती निलीमा मॅडम यांचेतील दि. 22/11/2021 रोजीचे पडताळणी दरम्यानचे संभाषण'' असे टंकलिखीत केलेले पांढऱ्या कागदाचे लेबल लावून त्यावर दोन्ही पंच व आपण सहया करुन खाकी पाकीट कार्यालयीन सीलने लाखेने सिलबंद करण्यांत आले. ते आपण ताब्यात घेतले होते.

माझे कामांचे बिलामधुन 10 टक्के कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम जिल्हा परीशद, लघु सिंचन विभागामार्फत सदर फाईलचे कामकाज पूर्ण झाल्यावर धनादेष स्वरुपात मिळणार आहे. त्याअनुषंगाने लिपीक श्री.

Scanned with CamScanner

सुगंधी हे माझे काम करून देण्याच्या मोबदल्यात लाच म्हणुन 2500/- रू. लाचेची रक्कम मागणी केल्याचे दिनांक 22/11/2021 रोजी पंच साक्षीदारा समोर केलेल्या पडताळणी मध्ये स्पष्ट झाल्याने, आपण दिनांक 23/11/2021 रोजी यशस्वी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविले होते.

त्यानंतर मी आज दिनांक 23/11/2021 रोजी सकाळी 10.00 वाजता आपले सुचनेनुसार अँन्टी करप्शन कार्यालय, नंदुरबार येथे हजर झालो. कार्यालयात त्यावेळी आपला स्टाफ व दोन्ही पंच असे हजर होते. आपण मला दोन्ही पंच व स्टाफ अशा सर्वांना यशस्वी सापळा कारवाई बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर मी माझे शेतीचे बचतीतून आणलेले एकूण 2500/- रूपये आपल्यासमोर हजर केले. त्यात 500/-रु. दराच्या पाच नोटा होत्या. सदर नोटांना आपल्या सूचनेवरुन पोहवा/संजय गुमाने यांनी बॅगेतून एक सिलबंद पाकीट आणि एक दिवा/टॉर्च काढून आमचे समोर ठेवला. तेव्हा सदर दिवा हा अल्ट्राव्हायोलेट दिवा आणि सिलबंद पाकीटात अँथ्रासिन पावडरची बाटली असल्याबाबत पोनि/वाघ यांनी त्यांचे गुणधर्म व वैषिश्टयाबाबत सांगितले. त्यानंतर प्रथम नैसर्गिक प्रकाषात आणि त्यानंतर आपण अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाचे पोलीस उपअधिक्षक कक्षाची खिडकी व दरवाजा बंद करुन कक्षाचे लाईट बंद करुन अंधार केला, त्या अंधारात अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात आपले दोन्ही पंचांचे, आपल्या स्टाफचे असे सर्वांचे हात व कपडे व मी लाच देणेकामी हजर केलेल्या 500 रूपये दराच्या पाच चलनी नोटा तपासल्या. सर्व काही नैसर्गिक नेहमीप्रमाणे दिसून आले. त्यानंतर कार्यालयाचे कक्षात पूर्ववत उजेड करण्यात आला.

वरील नोटांना पोहवा/संजय गुमाने यांनी त्या बाटलीचे झाकण उघडून त्या बाटलीतील अँथ्रासिन पावडर कापसाच्या बोळयाने एका पांढरे कागदावर दोन्ही बाजूने क्रॉस आकाराने लावली सदर नोटा कार्यालयाचे कक्षाची खिडकी व दरवाजा लाईट बंद करून अंधार करून अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाष टाकून तपासले असता, सदर नोटांवर फिकट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली त्यानंतर पोहवा/संजय गुमाने यांनी सदर नोटा माझे पॅन्टचे पुढील उजवे बाजुस असलेल्या खिषात ठेवल्या. त्यानंतर पोहवा/संजय गुमाने यांना सापळा पार्टीतून वगळण्यात आले. त्याबाबतचा सापळापुर्व पंचनामा कार्यालयात करण्यात आला होता.

त्यानंतर आपण, आपला स्टाफ व दोन्ही पंच असे आपले खाजगी वाहनाने तसेच मोटार सायकलीने अँन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय नंदुरबार येथुन सापळा कारवाईचे सर्व साहीत्य घेवुन 12.10 वाजता रवाना होवुन नंदुरबार शहरातील जिल्हा परिषद समोरील आंबेडकर भवन येथे पटांगणात 12.20 वाजता पोहचलो. त्यांनतर आपण पुन्हा सापळा कारवाईकामी मला व दोन्ही पंचांना सापळा कारवाईच्या पुन्हा सूचना दिल्या. त्यानंतर आपण आपलेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये दोन्ही पंचासमक्ष नवीन 16 जी.बी.चे कोरे मेमरीकार्ड टाकून व्हॉईस रेकॉर्डर माझे टी शर्टाच्या आतील बाजुस बनियानला लावून सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु केले. ती वेळ 12.28 वाजेची होती. त्यानंतर आपण मला व पंच नं. 1 श्री. वसावे यांना नियोजनाप्रमाणे आंबेडकर भवन, नंदुरबार येथुन लाचेची रक्कम देणेकामी पायी पायी जिल्हा परिषद नंदुरबार कार्यालयातील लघुसिंचन विभाग येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि/वाघ, पंच नं.2 श्रीमती साळुंके तसेच स्टाफ असे थोडया अंतराने पायी पायी रवाना होवून जिल्हा परिषद नंदुरबार कार्यालयातील लघुसिंचन विभागाचे कार्यालयाचे समोरील व्हरांडयात दबा धरुन थांबुन होते.

त्यानंतर मी व लिपीक श्री.सुगंधी यांना जिल्हा परिषद, नंदुरबार कार्यालयातील लघुसिंचन विभागात भेटलो व कामासंदर्भाने चर्चा केली. त्यावेळी लिपीक श्री.सुगंधी यांना ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम माझे पॅन्टचे उजवे खिशातून काढुन त्याचे समोर धरली असता त्यांनी ती स्विकारुन त्यांचे पॅन्टचे डाव्या खिषात ठेवली. त्यावेळी मी

Sbunk.

Scanned with CamScanner

लाच देण्यांचा पुर्वनियोजीत इषारा केल्याने सापळा पथकातील अधिकारी, स्टाफ व दोन्ही पंच हे आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणीच व्हरांडयात उभे असल्याने सक्रीय होवुन आमचे जवळ आले. त्यावेळेस पोना/देवराम गावीत व पोना/दिपक चित्ते अशांनी दोन्ही हात मनगटापासुन घट्ट पकडून ठेवले. त्यादरम्यान पोनि/वाघ यांनी माझे टी शर्टाचे आतील बाजूस लावण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून आपल्या ताब्यात ठेवले ती वेळ 13.04 वाजेची होती. त्यानंतर मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यांस सांगितले.

त्यानंतर आपण लिपीक श्री. सुगंधी यांना माझेकडुन लाचेची रक्कम घेतांना पंच साक्षीदारासमक्ष रंगेहाथ पकडल्यानंतर सर्व कार्यवाही केल्यानंतर आपला स्टाफ, दोन्ही पंच व लिपीक श्री.सुगंधी यांना घेवून अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयात आलो. त्याठिकाणी आपण आपली कागदोपत्री कार्यवाही केली.

दि 22/11/2021 रोजी श्री गुप्तेश चंद्रकांत सुगंधी, वय-46 वर्षे, धंदा नोकरी, कनिष्ठ सहाय्यक, वर्ग-3, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार मुळ रा. पोस्ट ऑफीस जवळ, तळोदा ता. तळोदा जि. नंदुरबार ह.मु. देसाईपुरा, संजय टाऊन हॉलच्या मागे, नंदुरबार जि. नंदुरबार यांनी माझेकडुन माझे कामांचे बिलामधुन 10 टक्के कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम जिल्हा परीशद, लघु सिंचन विभागामार्फत सदर फाईलचे कामकाज पूर्ण झाल्यावर धनादेष स्वरुपात मिळणार आहे. त्याअनुषंगाने लिपीक श्री. सुगंधी यांनी सदरचे काम करून देण्याचे मोबदल्यात लाच म्हणुन 2500/- रू. लाचेची रक्कम दिनांक 22/11/2021 रोजी मागणी केली होती. मागणी केलेली लाचेची रक्कम आज दिनांक 23/11/2021 रोजी पंच साक्षीदारासमक्ष स्विकारतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

तरी यातील श्री गुप्तेश चंद्रकांत सुगंधी, वय-47 वर्षे, धंदा नोकरी, कनिष्ठ सहाय्यक, वर्ग-3, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार मुळ रा. पोस्ट ऑफीस जवळ, तळोदा ता. तळोदा जि. नंदुरबार ह.मु. देसाईपुरा, संजय टाऊन हॉलच्या मागे, नंदुरबार जि. नंदुरबार यांनी भ्रष्ट व बेकायदेषीर मार्गाने स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी माझेकडुन लाचेची मागणी करुन ती लाच स्विकारली. म्हणून माझी त्यांचेविरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील संगणकावर टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणे व पाहणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

Shaurz.
( शैलेश हिरालाल चौरे )

Scanned with CamScanner

## General Diary Details
ठाणे दैनंदिनी तपशील

**State (राज्य):** महाराष्ट्र **District (जिल्हा):** नंदुरबार

**P.S. (पोलीस ठाणे):** नंदुरबार शहर

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 025
2. **G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 23/11/2021 22:07 वाजता
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** अटक/शरण
4. **Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** kirankumarbhimraokhedkar /पोलीस निरीक्षक
5. **Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**

   यावेळी आम्ही समाधान एम वाघ पोलीस निरीक्षक अँन्टीकरप्शन ब्युरो नंदुरबार नोंद घेतो की, आनच्याकडेस तपासावर असलेला गुरनं. गुरन931/2021मधील भष्टाचार प्रतीबंध (सुधारणा) अधि. 1988 चे कलम 7 प्रमाणे मधील आ.लो. से. गुणेश चंद्रकांत सुगंधी वय 46 व्यावसाय नोकरी कनिष्ठ सहाय्याक वर्ग 3 जिल्हा परीषद नंदुरबार राहणार देसाईपुरा संजय टाऊन हॉलच्या मागे नंदुरबार यांना सदर गुन्हयात अटक करणे आवश्यक असल्याने त्याची अटकेपुर्वी वैद्यकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय, येथुन त्याची वैद्यकीय तपासणी करुन त्यास दोन पंचा समक्ष अटक पंचनामा करुन अटक केली आहे. त्यास अटक केले बाबत आरोपीस सीआरपीसी कलम 50 अन्वये नोटीस देण्यात आली आहे. तसेच त्याचे अटके बाबत त्याचा लहान भाऊ हितेश चंद्रकांत सुगंधी वय 45 रा. प्लॉट नं.56 अ, सत्यम नगर दुधाळे शिवार नंदुरबार यांना समज देण्यात आली आहे. आरोपी अटकेबाबतची नोंद अटक रजिस्टर मध्ये व मानव अधिकार रजि. मध्ये नोंद घेण्यात आली असुन घेऊन स्टे.डा. नोंद घेण्यात आली आहे. आरोपी अटक करतांना मा. सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्त्वांचे तंतोतंत पालन करुन आरोपी अटकेची कार्यवाही करण्यात आली आहे.
7. **G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**

   गुरन931/2021मधील भष्टाचार प्रतीबंध (सुधारणा) अधि. 1988 चे कलम 7 प्रमाणे मधील आ.लो. से. अटक नोंद
8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

पोलीस ठाणे अंमलदार
नंदुरबार शहर पो.स्टे.

**Report Printed on**
(अहवाल मुद्रित केलेला दिनांक)**:** 23/11/2021

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**

**Name (नाव):** kirankumar bhimrao khedkar

**Rank (पद):** I (Inspector)

**Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):**

**Name (नाव):** kirankumar bhimrao

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):**



Scanned with CamScanner